# कृषि उत्पन्न बाजार समिती, महागांव


**प्रशासकिय इमारती जवळ, महागांव**

ता. महागांव जि. यवतमाळ पिन. ४४५२०५

फोन ऑफिस :- ९६०४८७६९६७ Email:-am_mahagaon@msamb.com


=====================================================================

जा. क्र. :- दिनांक :

कृषि उत्पन्न बाजार समिती महागांचे आस्थपनेवरील क.लिपीक व शिपाई संवर्गाची सरळसेवा पदभरती करीता दि. ०७/०३/२०१९ ते दि. २७/०३/२०१९ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत असुन उमेदवाराने संपुर्ण जाहिरात व अनुषंगिक सुचना काळजीपुर्वक वाचाव्या सदर पदांसाठीची आवश्यक शैक्षणिक अर्हता, नियम, अटी व इतर अनुषंगिक माहितीचा ससविस्तर तपशिल http//mahagaon.govbharti.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **पदसंख्या** | **संवर्ग** | **वेतन श्रेणी** | **शैक्षणिक पात्रता** |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ लिपीक | ०१ | वि.जा.भ.ज. | ५२०० ते २०२०० (ग्रे.पे. २४००) | पदविधर व MS-CIT |
| २ | कनिष्ठ लिपिक | ०१ | खुला/सर्वसाधारण | ५२०० ते २०२०० (ग्रे.पे. १९००) | १२ वी उत्तीर्ण व MS-CIT |
| ३ | शिपाई | ०१ | अनु.जमाती | ४४४० ते ७४०० (ग्रे.पे. १३००) | ७ वी पास |

**सचिव उपसभापती सभापती**
**कृषि उत्पन्न बाजार समिती, महागांव**

**कृषि उत्पन्न बाजार समितीचे पदभरती संबंधाने शैक्षणिक अहर्ता व इतर अनुषंगिक तपशीलवार माहिती .**

**पदाचे नाव : वरिष्ठ लिपिक**

| | |
|---|---|
| शैक्षणिक आर्हता | • पदविधर परिक्षा उत्तीर्ण<br>• एम.एस.सी..आय.टी. परीक्षा उत्तीर्ण |
| वयोमर्यादा | १ एप्रिल २०१९ रोजी उमेदवाराचे वय शासनाने विहीत केलेल्या वयोमर्यादेप्रमाणे किमान वयोमर्यादा १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष, मागासवर्गीय उमेदवाराचे बाबतीत कमाल ४३ वर्ष असावे. |

**पदाचे नाव : कनिष्ठ लिपिक**

| | |
|---|---|
| शैक्षणिक आर्हता | • १२ वी परीक्षा उत्तीर्ण<br>• एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण |
| वयोमर्यादा | १ एप्रिल २०१९ रोजी उमेदवाराचे वय शासनाने विहीत केलेल्या वयोमर्यादेप्रमाणे किमान वयोमर्यादा १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष, मागासवर्गीय उमेदवाराचे बाबतीत कमाल ४३ वर्ष असावे. |

**पदाचे नाव : शिपाई**

| | |
|---|---|
| शैक्षणिक आर्हता | • इयत्ता सातवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| वयोमर्यादा | १ एप्रिल २०१९ रोजी उमेदवाराचे वय शासनाने विहीत केलेल्या वयोमर्यादेप्रमाणे किमान वयोमर्यादा १८ वर्ष व कमाल ३८ वर्ष, मागासवर्गीय उमेदवाराचे बाबतीत कमाल ४३ वर्ष असावे. |
| कौशल्ये | १. उत्तम व्यक्ती संवाद कौशल्ये.<br>२. तणावग्रस्त परिस्थिती हाताळणे.<br>३. समन्वय. |

**अटी व शर्ती :-**

1) ऑनलाईन प्रणालीव्दारे ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आले नाहीत. अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.
2) उमेदवारानी आपला अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो 20kb पर्यंत स्कॅन करुन त्याला मिळालेल्या Application ID चे नावाने Save करावे. उदा जर Application ID 2DR35-37 असा असेल तर त्याला 2DR35-57 नावाने Save करुन Upload करावे तसेच उमेदवारांची स्वाक्षरी 20kb पर्यंत स्कॅन करुन त्याला मिळालेल्या Application ID चे नावासमोर S लिहून Save करावे. उदा. जर Application ID 2DR35-37 असा असेल तर त्याला 2DR35-37S नावाने save करुन Upload करावे.

3) **परीक्षेचे स्वरुप** :-

1) वरिष्ठ लिपिक पदाकरिता :- कमीत कमी अर्हता पदविधर आणि कनिष्ठ लिपीक करिता 12 वी परिक्षा उत्तीर्ण अशा पदकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांतर परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नाकरिता प्रत्येकी 2 गुण ठेवून एकुण 200 गुणाची लेखा परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल सदर परीक्षा इंग्रजी विषय वगळता अन्य विषयांची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल.
2) लिपीक टंकलेखक पदासाठी उमेदवारांची निवड करताना मुलाखती न घेता फक्त लेखी परिक्षा घेवून लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांचा आधारे निवड यादी तयार करुन निवड यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
3) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रं. प्रनिम 2010/209/प्र.क्र.66/10/13-अ दिनांक 19 जूल 2010 अन्वये उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिल्हांकित करण्यासाठी फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करावयाचा आहे. अन्य कोणत्याही साधना ा वापर केल्यास संबंधित उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
4) उमेदवारांनी परिक्षेस येण्या जाण्याचा प्रवासखर्च दिला जाणार नाही.
5) अनुसूचीत जाती, अनुसूचित, जामती वगळुन, विभुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब,क,ड व इतर मागासवर्ग प्रवर्ग आणि महिला आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या खुला प्रवर्गातील महिला यांना क्रिमीलेअर तत्व लागु करण्यात आल्याने, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे अद्यावत मुदतीचे असलेले वैद्य (Valid) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
6) काही अपरिहार्य कारणाने परिक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही, परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, परीक्षा सथगीत करणे अथवा रद्द करणे, अशंत:त बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे, भरती प्रक्रियेसंदर्भात उद्‌भवणारे वाद, प्रक्रारी इत्यादीबाबत बाजार समितीचा निर्णय अंतीम राहील, कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास / व्यवगत झाल्यास, रिक्त पदाच्या संख्सेत बदल झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही वा त्याबाबत कुठलाही दावा करता येणार नाही निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापनेबाबत / स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.
7) उमेदवारास मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
8) परीक्षा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम शासन निर्णय क्रमांक प्रनिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ दिनांक 27 जुन 2008 मधील मुद्या क्रमांक 6 मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

   a) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीम प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनूसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (14 व तत्सम जाती, भटक्या जमाती, जानेवारी 1990 पूर्वीच्या 28 व तत्सम जमाती) भटक्या जमाती (धनगर व तत्सम) इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर
9) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती व कागदपत्रे अपुर्ण सादर केल्यास / अगर खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास

आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी, नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्पावर अथवा नियुक्ती झाल्यानंतर सुध्दा उमेदवारी / नियुक्ती रद्द करण्यात येईल.

10) या जाहिरातील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

11) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16 मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक 2136/2011 च अन्य याचिकावर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक 25/8/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या अधिन राहुन नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 6 महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. अन्यता सेवा समाप्त करण्यात येईल.

12) लेखी परिक्षेत पात्र ठरुन निवड झालेल्या उमेदवाराची प्रारुप निवड यादी उमेदवारांचे मुळ दस्तऐवज पडताळणीचे अधिन राहून परिक्षा झाल्यानंतर mahagaon.govbharti.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच भरतीपक्रिये संबंधी वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुधारीत व अद्यावत सुचना कार्यालयीन सुचना फलकावर सांकेतीक स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर वेबसाईटवरील सुचनांचे वेळोवेळी न चुकता अवलोकन करावे.

13) वरील पदाकरिता पात्र/अपात्र उमेदवारां ी यादी त्यांचे अर्जाचे छाननीनंतर कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल तसेच mahagaon.govbharti.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. अपात्र ठरलेल्या उमेदवाराचे बाबतीत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जार नाही.

14) प्रस्तृत प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने असल्याने अर्जदाराने माहिती भरतांना अचूक, खरी /जी कागदपत्रे प्रमाणपत्र अर्ज करतेवेळी त्याचेजवळ उपलब्ध आहेत, अशीच माहिती भरावी. चुकीची/ खोटी/दिशाभुल करणारी अन्य इसमाची / अथवा नंतर (उशिराने) कागदपत्रे उपलब्ध होणारी माहिती भरल्यास व भविष्यात निदर्शनास आल्यास अथवा अशा उमेदवाराची निवड झाल्यास त्यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येईल. याची गांर्भिर्यपूर्वक अर्जदारानी नोंद घ्यावी.

15) निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर 60 दिवसाचे कालावधीनंतर प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व निवड न झालेल्या उमेदवारांचे अर्ज नष्ट केल्या जातील.

**भरती बाबत इतर आवश्यक सुचना**

1) उमेदवारानेऑलाईन ONLINE अर्ज करण्याबाबत सविस्तर सुचना mahagaon.govbharti.in या या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहीत केलेला नमुना अर्ज सदर संकेतसथाळावर उपलब्ध होईल. उमेदवार त्यांचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेलया ठिकाणी भरु शकतील. ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी दिनांक 07.03.2019 ते दि. 23.03.2019 पर्यंत राहील. उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर परिपूर्ण अर्जाची प्रिंट एक प्रति काढुन स्वत: कडे ठेवावी उमेदवाराने अर्जाची प्रत स्वत:जवळ जपून ठेवावी व मुळ दस्तऐवज पडताळणीच्या वेळी सदरची प्रत कार्यालयास सादर करावी. मुळ दस्तऐवज पडताळणीच्या वेळी अर्जाची एक प्रत कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

2) **परिक्षा शुल्क** :-

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **खुला प्रवर्ग** | **राखीव प्रवर्ग** |
|---|---|---|---|
| 1 | वरिष्ठ लिपीक | 500 | 200 |
| 2 | कनिष्ठ लिपीक | 500 | 200 |
| 3 | शिपाई | 500 | 200 |

3) इतर उमेदवार खालील नमूद पध्दतीने शुल्क अदा करु शकतील. सदर परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

भरती प्रक्रिये अंतर्गत अर्ज करण्यासाठी परिक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने mahagaon.govbharti.in या संकेतस्थळावर करता येईल. (इंटरनेट बँकिंग, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, भीम UPI) Union Bank of India खाते क्र. 438802010580617, IFSC Code : UBIN0543888 कृषी उत्पन्न बाजार समिती महागाव या खात्यात भरता येईल.

**पत्र व्यवहाराचा पत्ता :- सभापती/सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती, महागांव**

1) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर यशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
2) निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहीत केलेल्या भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.
3) आरक्षीत पदांकरीता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार सादर करणे बंधनकारक राहील.
4) आवेदनापत्र स्विकृत/ अस्विकृत करण्याचे अधिकारी, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल करण्याचे, तसेच त्याबाबत अंतीम निर्णय घेण्याबाबतचे संपूर्ण अधिकार सभापती कृषि उत्पन्न बाजार समिती महागांव यांनी राखुन ठेवलेले आहेत.
5) अर्ज सादर करणाऱ्या अर्जदारास / उमेदवारास जाहिराती मध्ये नमुद केल्याप्रमाणे त्यांची कोणत्याही प्रकारची पात्रता व कागदपत्र तपासणी न करता ऑलाईन पध्दतीने पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारास लेखी परिक्षेस लेखी परिक्षेस बसण्याची तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्यात येईल. त्यामुळे परिक्षेस गुणानुक्रमे निवड झालेल्या उमेदवार वरिल तपासणी अंती अपात्र आढळल्यास त्यांना अपात्र ठरवून पुढील निवड पक्रियेसाठी बाद ठरविण्यात येईल.
6) पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा दि. ........................रोजी घेण्यात येईल. यासाठी पात्र उमेदवारांनी परीक्षेसाठी प्रवेशपत्र दिनांक .............................रोजी कार्यालयाची वेबसाईट mahagaon.govbharti.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल उमेदवारांनी प्रवेशपत्र परस्पर डाऊनलोड करुन प्राप्त करुन घ्यावेत व सदर प्रवेशपत्र घेऊन लेखी परीक्षेसाठी हजर राहावे उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-** **स्वाक्षरीत/-**
सचिव सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, महागांव